२ **शालिवाहन व वर्षप्रतिपदेचा पोवाडा**

(भाग १)

(फटका) नौबत झडविंत नववर्षाची वर्षप्रतिपदा दिन आला ।
गुढ्या तोरणें घरोघरींची देती हर्ष जनहृदयाला ॥
रहा सदोदित आघाडीवर, कधीं न घ्यावी माघार ।
नामुष्कीचे जिणें जगाया अवतरलो का भूमिवर? ॥
प्रश्न पुसतसे असा अम्हांला गुढी पाडव्याचा दिवस ।
प्रश्नाचें या उत्तर द्याया वाचुनी पहा इतिहास ॥

(चाल) वाचुनी पाहतां इतिहास । आज समयास । उमजेल तुम्हांस ।
मर्द पूर्वजांचे पुत्र तुम्ही खास ॥ कसा फिरकेल तुमच्या
आसपास । घाण नामर्दपणाचा वास ॥

(चाल) अगणित शकांचें दळ आलं चालून ॥
चढविला हल्ला शत्रूनं मोठ्या दणक्यानं ॥
मुलखाच्या चारीही वाटा धरल्या रोखून ॥
गांवातल्या लोकांना मिळेना दाणावैरण ॥
उपासमार होऊनी झाले फार हैराण ॥
असा केला जोर फार काळ दुष्ट गनिमानं ॥
रागानं लाल फार झाला शालिवाहन ॥
दांत ओठ खाऊनी म्हणे माजला दुष्मान ॥
खोडकी जिरवु या त्याची करून धुमश्चान ॥
असं म्हणुन फेंकला घोडा मोठ्या वेगानं ॥

(चाल) अगणित सैन्य घेऊन । चालला शालिवाहन ॥
हातांत ढाल घेऊन । आपला भाला परजून ॥
घोड्यांच्या टापांपासून । हादरली भूमि दणक्यानं ॥
दिशा झाल्या धुंद धुरळ्यानं । झालं वरती गगनहि मलिन ॥

(चाल) गनिमास भिडला येऊन । शालिवाहन । मोठ्या त्वेषानि । (मोठ्या त्वेषाने) खणखणार तलवारींचा झडला । नादांचा गजर फार झाला । कोणीही ऐकेना कोणाला ॥ (प्रेतांचा खच रणी पडला ॥)

(चाल) जाहले युद्ध दारुण । तरीही पण । सोडुनी रण । जाईना दुष्मन । गेले खवळून । शालिवाहन । बोले सैन्याला ऽऽऽ ॥
नामर्द तुम्ही होतांत बांगड्या (कांकणे) घाला ॥

ऐकून तयांचे वचन । विषारी जणु बाण । हृदय विंधून । कासावीस प्राण । गेले देहभान । पार विसरून । घालण्या स्नान । शत्रुरुधिराने । आपल्या खड्गाला ऽऽऽ ॥
त्वेषाने होऊन चढविला शत्रुवर हल्ला ॥

(चाल) समशेर समशेरीस । भिडली झाला खणखणार ॥
रणवाद्यांचाही घोर नाद घणघणार ॥
घोड्यांच्या टापांचा किती होई खडखडार ॥
थयथया नाचती योद्धे होई दणदणार ॥
रक्ताच्या नद्या वाहती करून खळखळार ॥
वाटले भयंकर झाला मेघ गडगडार ॥
कोसळली वाटली विजाली नारून कडकडार ॥

(चाल) असे युद्ध झाले अफाट । शकुनी पाट । फुटली जिथं वार । गनिम तिथून धावत सुटला ॥ टाकुनी हत्यार समराला । (धरणीला) नेकतां भुई थोडी झाली त्याला ॥
शालिवाहन पाठलाग करी । खूप दुरवरी । शत्रुला पुरी । बसली दहशत, मोडली खोड ॥ शत्रुचा (शकांचा) झाला पुरा बीमोड । दुर्जो शौर्यास मिळेना तोड ॥

(चाल) उडवुनी शकांची छकलें । वीर आले परत माघारीं ॥
जयघोष लोक गाइले । केली विजय घडी साजरी ॥
दिमाखानें वीर ते सारे । परतले आपुल्या घरीं ॥
सुवासिनींनी ओवाळिले । पंचारती घेऊनी करीं ॥
ओवाळितां झाली धांदल । आनंद मावेना उरीं ॥

(चाल) अशा परी शालिवाहनानं । केले दुश्मन । फार हैराण । विजय मिळविला शकांवरती ॥ (विजय मिळविला त्यांच्यावरती ॥) गाऊं आजला त्याची कीर्ति । (घेऊं त्यापासून आज स्फूर्ति ।) (हो आनन्द त्याची स्मृति ।) ~~[illegible]~~ वसन्तराय शाहिर विनवी संप्रति ॥

मुम्बई,
रचना २८/२८ मार्च १९५५. —x—

(भाग २)

सांगतें ब्रह्मांड पुराण । ब्रह्मदेवानं । विश्व हें छान । केलं निर्माण आजच्या दिवशीं ॥ चतुर तो चतुराननं होउनी । चतुर तो शिल्पकार होशी । तुला नच त्याच्या शिल्पासी ॥
ब्रह्मदेव कुशल मूर्तिकार । हुशार कारागीर । म्हणुन सुंदर । विश्वाला प्राप्त झाला आकार ॥ विलसते इथें विविधता फार । विविधतेंत सुंदरता साकार ॥

(चाल) नारदांची नारदी झाली कथा पुराणांत ॥
प्रतिवर्षी चैत्र प्रतिपदा पुन्हा तिज होत ॥
प्रतिवर्षी देव तो दिवस साजरा करित ॥
सौख्याचा उसळे सागर त्यांच्या हृदयांत ॥
घरोघर गुढ्या तोरणें बघा उभारीत ॥

अशा परी नारदास झाले पुत्र हो साठ ॥
तीं साली साठ संवत्सरें बांधा खूणगांठ ॥

(चाल) आतां एका चित्त देऊन । विनवितों हात जोडून ॥
सुग्रीव पत्नीचें हरण । जबरीनं केलं वालीनें ॥
भावाला दिला हांकलून । आपल्या राज्यामधून ॥

(चाल) सुग्रीव होऊनी प्रणत । रामासी वदत । करावी मदत । राम साह्यास धावुनी आला ॥ भक्तवत्सल प्रभू दयाळा । दिलासा दिला सुग्रीवाला ॥
सुग्रीव-वाली संक्रुद्ध । झाले कटिबद्ध । कराया युद्ध । देऊनी परस्परां आह्वान ॥ घेण्याला परस्परांचा प्राण । दोघांना उरलें नाहीं मुळीं भान ॥
तुंबळ युद्ध जाहलें वालीच्या बळें । सुग्रीव कोसळे धरणीवर होऊनिया घायाळ ॥ रामाच्या भात्यांतून तात्काळ । सुटला बाण झाला वालीचा काळ ॥

(चाल) परनार पुढे ईश्वराची । भौंवली इंद्राला साची । करुनिया कमाल कपटाची । भोगिला नार दुसऱ्याची । अहिल्येस पाडिली फशीं ।
म्हणून सहस्र भगांचा रोग लागला त्यासी ॥
चंद्रान केलं बदकर्म गुरुपत्नीसी ॥
झाला क्रुद्ध गुरु अन् शाप देई चंद्रासी ॥
बघा अजुन खंगतो येतां कृष्णपक्षासी ॥
परनार कशी पचणार सांगा वालीसी ॥
नाचायला कोण खेळून खेळ आगीशीं ॥

(चाल) अशापरी वालीला मारून । सोडविली सुग्रीव कामिणा ॥
प्रजा फार गांजली वालीनं । म्हणून गेले प्रभूला शरण ॥

रामाच्या अक्षय बाणानं। सोडविलो भूमी दक्षिणा॥
घरोघर उभारिती ध्वज। आनंदानं गुढ्या तोरणं॥
झाला सण तेव्हापासून। हा वर्षप्रतिपदा दिन॥

(चाल-डोंगर) रावणानं सारा देव कैद केला। सर्वांना अवलंय कामाला।
इंद्र बघा करतो रखवालीला। वारा बघा झाडी अंगणाला।
सूर्य, चंद्र आणि वरुणाला। त्यानं बघा लावलं दावणीला।
इतर देव ठेवले दिमतीला। कित्येकांना वाड्याच्या पायऱ्यांला॥
लावलं बघा दादा॥ दादा र जि र दा जी जी॥
परस्त्रीचा मोह फार झाला। कपटानं हरलंय सीतेला।
आणुनी ठेवलंय लंकेला। रामाचा क्रोध फार झाला। शासन
केलं रावणाला। चौदा चौकड्यांच्या राजाला। बाणानं त्याच्या दाही
मुंडक्यांला। सोडवुनी आणलंय सीतेला। वर्षप्रतिपदेच्या दिवसाला।
अयोध्येत प्रवेश त्यानं केला। झाला बघा आनंद लोकांला। सजविली
गुढी न् तोरणाला॥ घरोघर दादा॥ दादा र जि र दा जी जी॥
महाभारत वर्णी गोष्टीला। चेदी देशाचा राजा झाला।
वसू नावाच्या सांगतो तुम्हाला। त्यानं राज्याचा त्याग केला। गवता-
सम मानून राज्याला। गेला तपसाठी जंगलाला। तपाचरणात दंग
झाला। देहभान सारं विसरून गेला। म्हणुन त्याला इंद्र प्रसन्न
झाला। उपदेश काय केला वसुनृपाला॥ सांगतो तुम्हा दादा॥
पृथ्वीवर राज्य करायाला। दुसरा कोणी राजा नाही उरला।
तूंच एक योग्य दिसशी मजला। हिताची गोष्ट सांगतो तुजला।
माझ्या जिवाभावाच्या मित्राला। दिव्य एक विमान देतो तुजला।
तशीच घे वैजयंतीमाला। गळ्यात घाल, युद्धामध्ये तुजला॥
भीती नाही दादा॥ दादा र जि र दा जी जी॥

(चाल) ~~अश्व~~ साधूंच्या रक्षणासाठी। राजाच्या (वसूच्या) हाती। वेळूची
काठी। दिली इंद्राने प्रेमाची खूण॥ वस्त्रालंकारे तिला मढवून।

राजानं पुजिली खूष होऊन । दासांनी ऐका लक्ष देऊन ॥

(चाल) अशा परी गुढीचं गूढ । ठेविलं रसिकांपुढं ॥
ऐकावा आतां यापुढं । लोकांत विधी जो रूढ ॥

(चाल) खातो कडुनिंबाच्या पाला आजच्या दिवसाला ॥
उपदेश देतसे रूढी ही आपणांला ॥
जीवनातला कडुपणा पाहिजे समदा पचवीला ॥
करा प्राप्त निरोगी न तेजस्वी शरीराला ॥
काही करा त्यागाचा संकल्प आजच्या घटकेला ॥
संकल्प करून कोणत्या घ्या कामाला ॥
साडेतीन मुहूर्तांपैकी पहिल्या मुहूर्ताला ॥
आढावा मागच्या वर्षाचा पाहिजे घेतला ॥

(चाल) पुढच्या वर्षी प्रगति करणार । असा निर्धार । करून घ्या म्हणारं ।
त्याला पावनं आजच्या समयास ॥ प्रयत्नांची धरू
धरूनि मग कास । विघ्नांचा होईल पुरा मग नाश ॥
गुरुकृपा जरी लाभेल । तरीच मग मोक्ष । विद्या पावेल ।
रस्त्यावर नाणी नाहीं तर खास ॥ ह्याहिरी दीक्षा घ्यावी
शिष्यास । वसन्तराय विनवी महादेवास ॥

मुंबई
रचनाकाल - २९.३.१९५५ ते
४.५.१९५५

# ३ युगपुरुष लोकमान्य टिळक - पोवाडा

चौक १

(चंद्रकांत) शाहिर सांगे रसिक जनांला चला चला जाऊं।
लोकमान्य टिळकांच्या चरणीं नतमस्तक होऊं ॥
मृतप्राय राष्ट्रास जयांनें संजीवनी दिधली।
पढवुनि स्वराज्य-मंत्र जयानें जनता जागविली ॥
बृहस्पतीहि थकेल करतां गुणवर्णन ज्यांचें।
गुणाब्धिमंथनिं सरस्वतीच्या शक्ति नुरे वाचे॥
तसा गुणोदधीमज्जनिं माझा लागणार पाड।
नाहीं स्फूर्तिचा अजुनी रेखिला लहानही आड॥
तथापि लोकोत्तर पुरुषांची गाऊनियां गाणी।
बोधामृत मिळुनियां होतसे पुनीत निज वाणी॥
अफाट गुणसागरीं लोटले कवितेचें तारूं।
वाटे भय डगमगते नौका, हाक कुणा मारूं॥
सज्जन-तारक विघ्न-निवारक (दुष्टनिवारक) वंदुं गणेशाला।
विघ्नें हरुनी मंगलमूर्ती दाविल मार्गाला ॥

(चाल) स्वराज्याचा मंत्र ज्यानं दिला। हिंदी लोकांला। अजरामर झाला।
टिळक लोकमान्य नांव ज्याला॥ देशाच्या भाग्यतिलक झाला। मुजरा
शाहिराचा पाहिला त्याला॥
शके १७७८। दिवस सोमवार। सकाळच्या प्रहर। उगवला भास्कर
गगनांत॥ अंधकाराचा करुनि अंत। उजळुनी टाकी नभःप्रांत॥

(चाल) अशा वेळीं पुरा खरोखर। येई ईश्वर। घेऊनि अवतार। भारतभूवर॥
वद्य ... पष्ठीला। आषाढ महिन्याला। बाळ जन्मला। टिळक नरवीर॥
डोळे भरून माता पार्वती। पाही बालमूर्ती। सुखावली चित्तीं। हर्ष आनिवार॥
कुळदीपक पाहून सुता। हरखला (मोदही) चित्ता। गंगाधर पिता। धन्य होणार॥